# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
## P.R.O Office, Palghar
Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


**प्रेसनोट क्र.४९४ दि.०२/०६/२०२०**

# सावधान ! पालघर जिल्हयात दिनांक ०१/०६/२०२० ते ०४/०६/२०२० या कालावधीत चक्रीवादळ धडकणार असल्याची दाट शक्यता...

अरबी समद्रात दिनांक ०१/०६/२०२० ते ०४/०६/२०२० या कालावधीत चक्रीवादळ धडकणार असल्याचे हवामान खात्याने सुचित केले आहे. या वादळाचा फटका पालघर जिल्हयाला बसण्याची शक्यता असल्याने पालघर जिल्हयातील मच्छिमारांना समुद्रात जाण्यास तसेच पालघर जिल्हयात सर्व समुद्र किनारी जाण्यास मनाई आदेश लागु करण्यात आले आहेत. पालघर जिल्हयात आपत्कालीन यंत्रणांना सज्ज ठेवण्यात आले आहे. पालघर पोलीस दलाकडुन मच्छीमार आणि मच्छीमार सोसायटी यांना सतर्क केले असुन सागर रक्षक दले, पोलीस पाटील, पोलीस मित्र, सेवाभावी संस्था यांना अवगत केले आहेत. सर्व सागरी पोलीस ठाणे यांना व इतर सर्व संबधीत यंत्रणा उदा. सार्वजनीक बांधकाम विभाग, बीएसएनएल, मत्स्यव्यवसाय, बंदर, कस्टम, शासकिय दवाखाने, एम.एस.ई.बी वगैर यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी यांना सतर्कते बाबत कळविण्यात आले आहेत. तसेच समुद्र किनारी राहणा-या सुमारे २०८६ लोकांना चक्रीवादळ येणार असल्याने सतर्कतेबाबत बल्क एस.एम.एस. व्दारे अवगत करण्यात आले आहे. पालघर जिल्हयात एनडीआरएफ च्या २ तुकडया दाखल झाल्या असुन पालघर व डहाणु येथे कार्यान्वीत केलेल्या आहेत.

**मी दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, पालघर जिल्यातील नागरीकांनी चक्रीवादळ येण्याच्यापूर्वी खालील प्रमाणे खबरदारी घेण्याबाबत आवाहन करत आहे.**

- लक्षात ठेवावे की, चक्रीवादळाची सुचना प्राप्त होणे याचा अर्थ पुढील २४ तासांमध्ये धोका आहे सावध रहावे.
- समुद्र, खाडी, किंवा समद्र तसेच खाडीलगत असणारे छोटे मोठे नदी नाले यांना मोठया प्रमाणावर भरती येईल.
- जेव्हा तुमचे क्षेत्र हे चक्रीवादळाच्या धोक्यात सापडते तेव्हा खाडी किनारी किंवा किना-यालगतचे इतर पानथळ क्षेत्रे यापासुन दुर जावे.
- उंचावरील ठिकाणी किंवा आश्रय स्थळी जाण्याचा मार्ग पाण्याखाली येण्यापुर्वीच बाहेर पडावे.
- घराजवळ असलेले वाळलेले लाकुड किंवा वाळलेली झाडे काढुन टाकावीत.
- जोराच्या वाऱ्याने उडु जाऊ शकतात अशा ओंडक्याच्या राशी, सुटया पत्राचे निवारे, सुटया विटा, कचऱ्याचे डबे, नामफलक वस्तु बांधुन ठेवाव्यात.
- मोडकळीस आलेल्या इमारती पाडुन टाकाव्यात .
- अफवांकडे लक्ष देऊ नका, आणि त्या पसरवु नका त्यामुळे भिती निर्माण होणार नाही.
- चक्रीवादळादरम्यान घरातील मुख्य विद्युत जोडणी बंद करावी.
- संकटकालीन वापराकरीता कोरडे व खराब न होणारे खाद्यपदार्थ सोबत ठेवावे तसेच लहान मुलांसाठी व प्रौढ व्यक्तींसाठी लागणारा विशेष आहार सोबत ठेवावा.

- खिडक्यांच्या काचा बंद कराव्यात किंवा वाऱ्यापासुन संरक्षण देणाऱ्या झडपा घालुन ठेवाव्यात.
- समुद्र तसेच खाडी किनाऱ्यावरील नागरीकांनी आधी सुरक्षीत स्थळी जावे.
- जिल्हयातील मच्छिमारांनी समुद्रात जावु नये.
- समुद्र किना-यावरील पर्यटक यांनी किना-यावर जाणे टाळावे.
- कोणत्याही प्रकारच्या बोटी घेवुन खाडी किंवा समुद्रात घेवुन जाणे टाळावे.
- समुद्र किना-यावरील लगतच्या गावांनी अधिक सर्तक राहणे आवश्यक आहे.
- मुसळधार पावसामध्ये ज्या सखल भागात पाणी साचते अश्या ठिकाणाच्या नागरीकांनी पाण्याची पातळी वाढल्याचे लक्षात येताच ते ठिकाण सोडुन सुरक्षीत स्थळी जावे.
- तसेच चक्रीवादळाचा धोका उद्भवल्यास सर्व सागरी पोलीस ठाणे येथे उपाययोजनेसाठी लागणारी सर्व साधन सामुग्री उपलब्ध करण्यात आली आहे.
- काही आपत्कालीन परिस्थीती उदभवल्यास पोलीस ठाणे तसेच जिल्हा आपत्ती निवारण कक्षेमध्ये तात्काळ संपर्क साधावा.

**संपर्क क्रमांक**

| | |
|---|---|
| नियंत्रण कक्ष, पालघर- | ९७३०७११११९/८६६९६०४१०० |
| आपत्ती निवारण कक्ष पालघर- | ०२५२५२९७४७४ |
| आपत्ती निवारण अधिकारी - | ९१५८७६०७५६/८३२९४३९९०२ |